# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी क्र. : (०२२)६९९६५५५५  फॅक्स क्र. ६९९६५५९९** **ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**

जा. क्र./मरासुम/प्रशासन/२५४०/२०२४ दि. १३/०८/२०२४.

**विषय :- महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे Innova एक वाहन विक्री करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या नावे असलेले एक Innova चार चाकी वाहन विक्री करावयाचे आहे. वाहनाची अधिक माहिती जाहिराती मध्ये नमुद करण्यात आली आहे. इच्छूक खरेदीदारकांनी वाहनाची योग्य ती माहिती घेऊन, दरपत्रक तयार करावे; त्यासोबत जाहिराती मध्ये नमुद आवश्यक कागदपत्र जोडून सिलबंद लिफाफ्यात कार्यालयाच्या वरील नमुद पत्यावर दि. १४/०८/२०२४ ते दि. २६/०८/२०२४ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी ९.४५ ते सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत पाठवावीत. नमुद शेवटच्या दिनांका नंतर येणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

वाहनांच्या अधिक माहिती करीता maharashtra.gov.in या mahasecurity.in वेबसाईटला भेट द्यावी.

या प्रक्रिये संदर्भातील अंतीम निर्णय महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचा राहिल.

Sd/-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

जा. क्र./मरासुम/प्रशासन/२५४०/२०२४ दि. १३/०८/२०२४.

# <u>जाहिरात</u>

## <u>महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे Innova एक वाहन विक्री करणेबाबत.</u>

# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**


**दूरध्वनी : (०२२)६९९६५५५५, फॅक्स :(०२२)६९९६५५९९.**

**ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**

**महामंडळाची वेबसाईट :- mahasecurity.gov.in**

## १) परिचय

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ, असुन महामंडळातर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील शासकीय/निमशासकीय/संवेदनशील/खाजगी व्यावसायिक आस्थापनांना सुरक्षारक्षकां मार्फत सशस्त्र सुरक्षा व संरक्षण पुरविले जात आहे.

महामंडळाच्या नावे असलेले खालील मॉडेलचे एक वाहन विक्री करावयाचे असून, त्यासाठी इच्छूक खरेदीदारांकडून दरपत्रक मागविण्यासाठी सदरची जाहिरात देण्यात येत आहे.

## २) वाहनाचा तपशील खालील प्रमाणे :-

| अ. क्र. | वाहनाचा तपशील |
|---|---|
| 1 | Vehicle No :- MH-01-AN-0276 |
| 2 | Model :- innova |
| 3 | Engine No.:- 2KDU195130 |
| 4 | Chassis No. :- MBJ11JV4007378902 |
| 5 | Class :- LMV |
| 6 | MFG CD :- TOYKIR |
| 7 | Product Year (Vehicle purchase year) :- 2013 |
| 8 | आत्तापर्यंत वाहन चालविलेले Kilo Meters :- १५१२८० |

## ३) महत्तवाच्या सूचना :-

कृपया, वाहन खरेदी करणेपुर्वी; दरपत्रक सादर करावयाच्या खालील सूचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

१. वाहनाची सर्वाधिक किंमत देण्याऱ्या खरेदीदारकांची निवड करण्यात येईल.

२. उपरोक्त वाहन **'आहे त्या स्थितीत'** विक्री करण्यात येणार आहेत.

३. वाहन पहाणी दरम्यान चालू स्थितीत आढळल्यास व दरपत्रकांची कार्यालयीन कार्यवाही; करून वाहन ताब्यात देई पर्यंत; वाहन बंद पडल्यास, वाहने कार्यालयाकडून चालू करून किंवा त्याचे आवश्यक ते कामकाज करून ताब्यात दिली जाणार नाहीत; याची खरेदीदारकांनी नोंद घ्यावी.

४. दरपत्रक सादर करणे करीता कार्यालयाद्वारे नमुना तयार करण्यात आला असून, तो जाहिरातीच्या शेवटी प्रसिध्द् करण्यात आला आहे. सदरच्या नमुन्यातच आपले दर नमुद करून दरपत्रक सादर करावे.

५. दरपत्रक सादर करताना इसारा (EMD) रक्कम रु. ४०,०००/- चा डीमांड ड्राफ्ट सोबत जोडावा. डीमांड ड्राफ्ट - **"Maharashtra State Security Corporation"** या नावाने करावा.

६. निवड न झालेल्या दरपत्रकधारकास इसारा (EMD) रक्कम परत करण्यात येईल.

७. निवड झालेल्या दरपत्रक धारकाची इसारा (EMD) रक्कम बोली रक्कमेत समायोजीत करण्यात येईल. निवड झालेल्या दरपत्रकधारकाने वाहन घेण्यास असमर्थता दर्शविल्यास त्याची इसारा (EMD) रक्कम त्यास परत केली जाणार नाही. ती रक्कम जप्त करण्यात येईल.

८. दरपत्रकामध्ये कोठेही खाडाखोड/ओव्हररायटिंग/पांढरीशाही लावणे टाळावे, तसे केल्यास त्यांची दरपत्रक रद्द करण्यात येईल.

९. वाहनाची पहाणी तपासणी करणेकरीता तसेच वाहनाची अधिक माहिती मिळविणेकरीता कार्यालयाच्या खालील नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत ९.४५ AM ते ६.१५ PM मध्ये प्रशासन विभागाशी संपर्क साधावा.

१०. अंतीम दिनांका नंतर प्राप्त दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

११. खरेदीदाराने दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात खालील नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावीत. पोस्टाने कुरीअरद्वारे दरपत्रक पाठविण्यात येत असल्यास नमुद दिनांका पुर्वी मरासुम कार्यालयास प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. मुदतीनंतर प्राप्त झालेली दरपत्रक विचारात घेतली जाणार नाहीत. तसेच ई-मेल अथवा वॉट्अप याद्वारे दरपत्रक पाठवू नयेत.

१२. खरेदीधारकास निवड करण्यात आल्याबाबत कळविण्यात आल्यानंतर दरपत्रकात नमुद रक्कम भरून एक आठवडयात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे अत्यावश्यक राहील. अन्यथा दरपत्रक रद्दबातल ठरविली जाईल.

१३. दरपत्रकात सादर केलेल्या बोली रक्कमेवर आवश्यक तो GST कर भरणा करावा लागणार आहे.

१४. वाहनांच्या हस्तांतरण नोंदणी (Registration) व आवश्यक रोड टॅक्स रक्कमे बाबत सर्व प्रक्रिया निवड करण्यात आलेल्या खरेदीदारकास स्वखर्चाने करावी लागेल. तसेच आवश्यक तेवढा टॅक्स भरणा स्वखर्चाने करावा लागेल. वाहतूक नियम भंगाबाबत वाहनावर E-Challan द्वारे दंड असल्यास तो महामंडळ भरणा करेल.

१५. निवड केलेल्या खरेदीदारकांस वाहन खरेदीच्या अटी व शर्तीसह दरपत्रक मंजूरीचे पत्र ई-मेल किंवा पत्राद्वारे कळविले जाईल.

**४) दरपत्रकधारकांनी सादर करावयाची कागदपत्र :-**

१) खरेदीदाराचे दोन फोटो.

२) ओळखीचा पुरावा पॅनकार्ड/आधार कार्ड/पासपोर्ट/मतदार व ओळखपत्र इ.यापैकी कोणतेही एक

३) कंपनी/फर्मच्या नावे वाहने खरेदी करावयाचे असल्यास त्याचे GST अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

४) इसारा (EMD) रक्कम रु. 40,000/- चा डिमांड ड्राफ्ट

**५) दरपत्रक पाठविणे करिता व उघडणेकरीता हजर रहावयाचे असल्यास पत्ता व दुरध्वनी क्र. :-**

मा. पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी :- (०२२) ६९९६५५५५ फॅक्स :- ६९९६५५९९

**६) महत्तवाच्या दिनांक व वेळ :-**

१. दरपत्रके सादर करण्याची पहिली दिनांक - दि. १४/०८/२०२४ वेळ सकाळी ९.४५ पासून सुरु

२. दरपत्रके सादर करण्याची शेवटची दिनांक - दि. २६/०८/२०२४ व वेळ १८.०० वाजेपर्यंत.

३. दरपत्रके उघडणेकरीताची दिनांक - दि. २७/०८/२०२४ व वेळ १२.०० वाजता.

**सदर निवड प्रक्रिया जाहिरात कोणत्याही वेळी/कोणत्याही कारणास्तव/कोणत्याही टप्प्यावर/पुर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा/फेरबदल करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.**

Sd/-
पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

प्रति,
पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ,
मुंबई.

**विषय :- महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे Innova एक वाहन विक्री करणेबाबत.**

| अ. क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | खरेदीदारकाचे नाव / कंपनी असल्यास कंपनीचे नाव | |
| २ | खरेदीदारकाचा पुर्ण पत्ता | |
| ३ | खरेदीदारक कंपनी असेल तर कंपनीचा पूर्ण पत्ता | |
| ४ | जाहिराती नुसार वाहन पाहणी केल्याचा दिनांक | |

शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेली जाहिरात जा. क्र./मरासुम/प्रशासन/ /२०२४, दि. / /२०२४ अन्वये सदरची दरपत्रक सादर करीत आहे/आहोत. जाहिराती मध्ये नमुद अटी, शर्ती, नुसार खालील नमुद केलेले वाहन त्यासमोर नमुद केलेल्या किंमतीस जसे आहे; त्या स्थितीत (As is where is basis) या तत्तवावर खरेदी करू इच्छितो. सदरचे वाहन खरेदी नंतर हस्तांतरण नोंदणी (Registration & Tax) करीता होणारा सर्व खर्च मी/आम्ही स्वखर्चाने करणार आहे./आहोत.

वाहन क्र. -------------------------------------------- बोली रक्कम रु. -----------------------------------

उपरोक्त वाहनाच्या बोली रक्कमेवर आपल्या कार्यालयाकडून आकारण्यात येणारा आवश्यक तो GST कर भरण्यास माझी संमत्ती आहे.

जाहिराती मधील नमुद सर्व सुचना, अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

आपला विश्वासू

नाव व दरपत्रकधारकाची सही
संपुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक

**टीप :-** कंपनीच्या वतीने वाहन खरेदी करणार असल्यास, कंपनीचा संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक प्रामुख्याने नमूद करावा.